स्थायी समितीची विशेष सभा मंगळवार दि.05.03.2013 रोजी सकाळी 11.00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचे कार्यवृत्त.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 11. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 12. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 13. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 14. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 15. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

<u>अनुपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |

<u>उपस्थित अधिकारी</u>

1. श्री.हेमंत पवार, अति.उपायुक्त
2. श्री.हरीश दुबे, निगम सचिव

पिठासीन अधिकारीः— आजच्या सभेची कार्यवाही सुरू होण्याचे अगोदर सर्वप्रथम उपस्थित स्थायी समितीच्या सदस्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. मुंबई प्रान्तिक अधिनियम 1949 (सुधारणा) व नागपूर शहर महापालिका अधिनियम 1948(निरसन) 2011(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012) मधील कलम 20(3) अन्वये स्थायी समितीच्या दिनांक 02.02. 2013 रोजी ठराव क्रमांक 367 अन्वये झालेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने स्थायी समितीकरिता वर्ष 2013—14 करिता कायम राहिलेले आठ(8) मा.सदस्य आणि महानगरपालिका ठराव क्रमांक 79 दिनांक 15.02.2013 अन्वये नियुक्त करण्यात आलेले आठ(8) मा.सदस्य असे एकुण 16 मा. सदस्यांमधून एकाची स्थायी समितीचे सभापती पदाकरिता निवड करावयाची आहे. ही निवड महाराष्ट्र शासनाने दिनांक 17 फेब्रुवारी 2007 रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार करावयाची आहे.

<u>ठराव क्रमांक 1</u>ः— सन 2013—14 करिता स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे.

पिठासीन अधिकारीः— स्थायी समितीच्या सभापतीची निवड करण्याकरिता निगम सचिव यांनी त्यांच्याकडे सभापती पदासाठी प्राप्त झालेली नामनिर्देशन पत्रे माझेकडे द्यावी.

(यावेळी निगम सचिव यांनी सभापती पदाकरिता प्राप्त झालेली ( 4 ) नामनिर्देशन पत्रे पीठासीन अधिकारी यांना सादर केली)

पिठासीन अधिकारी :— निगम सचिवामार्फत त्यांचेकडे प्राप्त झालेले एकुण ( 4 ) नामनिर्देशन पत्रे माझेकडे दिली. नामनिर्देशन पत्राची छानननी केली असता एकूण ( 4 )

नामनिर्देशन पत्रे वैध आढळली. वैध नामनिर्देशन पत्रानुसार एकूण ( 1 ) उमेदवार होतात. त्यांची नांवे मी वाचून दाखवितो.

| अ. क्र. | नामनिर्देशित उमेदवारांचे नांव | अनुमोदकाचे नांव | सुचकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | श्री. अविनाश निळकंठ ठाकरे | श्री. सतिश विठ्ठलराव होले | श्री. दयाशंकर चंद्रशेखर तिवारी |
| 2 | श्री. अविनाश निळकंठ ठाकरे | सौ. अनिता प्रदीप वानखेडे | सौ. वंदना विनोद इंगोले |
| 3 | श्री. अविनाश निळकंठ ठाकरे | श्री. परिणय रमेश फुके | डॉ. प्रशांत य. चोपडा |
| 4 | श्री. अविनाश निळकंठ ठाकरे | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | श्री. किशोर चिंधुजी गजभिये |

पिठासीन अधिकारीः— उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी 15 मिनिटाचा अवधी देण्यांत येत आहे. ज्यांना उमेदवारी परत घ्यावयाची आहे. त्यांनी माझेकडे लेखी अर्ज सादर करावा.

(यावेळी उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी 15 मिनिटाचा अवधी देण्यात आला)

पिठासीन अधिकारीः— मा.सदस्यगण, 4 नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाली असून ती चारही **श्री. अविनाश निळकंठ ठाकरे** यांची आहेत. दिलेल्या अवधीत श्री. अविनाश निळकंठ ठाकरे यांनी नामनिर्देशन पत्रे मागे न घेतल्यामुळे ते एकमेव उमेदवार उरतात. त्यामुळे **श्री. अविनाश** निळकंठ ठाकरे हे स्थायी समिती सभापती म्हणून बिनविरोध निवडुन आल्याचे मी घोषित करतो.

ठराव क्रमांक 2ः— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. तसेच आजची सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यात येते.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

पिठासीन अधिकारी